

# कर्म चातुर्वर्ण

भारत हा एक प्राचीन देश आहे. प्राचीन काळात आजच्यासारखा भारत राजकीयदृष्ट्या एकसंध नव्हता. त्यावेळी इथे असंख्य वेगवेगळी राज्ये होती. वेगवेगळे असंख्य शासक होते, मात्र तरीही जीवन शैलीच्या दृष्टीने हा प्रदेश एकसंध होता. बऱ्याच अंशी समान संस्कृती आणि जीवनशैली या सगळ्या प्रदेशात अस्तित्वात होती आणि त्यामुळे हा प्रदेश एकत्र बांधला गेला होता. या संस्कृतीचे व जीवनशैलीचे अनेक घटक आजसुद्धा अस्तित्वात असलेले दिसतात. इथे अस्तित्वात असलेल्या हिंदू संस्कृतीचे चार आश्रम, चार पुरुषार्थ व चार वर्ण हे प्रमुख आधार होते. मनुष्याच्या आयुष्याची विभागणी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम अशा चार आश्रमांत केलेली होती. धर्म, कर्म, अर्थ आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचं पालन माणसाने त्याच्या आयुष्याभरात करावं अशी शिकवण होती. याचप्रमाणे श्रमाच्या विभागणीच्या तत्त्वानुसार चार वर्णांची रचना अस्तित्वात होती. प्राचीनकालीन समाज व्यवस्थेचे हे सारे घटक होते. त्याद्वारे माणसाच्या व समाजाच्या जीवनाचं व्यवस्थापन केलं जात होतं अर्थात हे सारं इथे मांडताना आज असलेल्या भेदा-भेदांचं, वर्णांच्या उतरंडीतून निर्माण झालेल्या आर्थिक- सामाजिक विषमतेचं समर्थन करण्याचा मुळीच उद्देश नाही, हे लक्षात घ्यावं.

प्राचीन काळात या व्यवस्थेचं स्वरूप विशुद्ध होतं. आपल्या आवडीनुसार कर्म निवडण्याचं स्वातंत्र्य व्यक्तीला होतं. कर्मानुसार त्याचा वर्ण ठरत असे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्णांमध्ये कर्मांची विभागणी केली गेली होती. ज्ञान

मिळवणं आणि ते समाजाला देणं हे कर्म करणाऱ्यांना ब्राह्मण म्हटलं गेलं. वेद-विद्येचं अध्ययन व अध्यापन करणं, त्यासाठी आश्रम स्थापित करणं, तिथे दाखल झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची व्यवस्था करणं, त्यांची काळजी घेणं आणि त्यांना जीवन जगण्यासाठी परिपक्व बनवणं असं त्यांच्या कामाचं स्वरूप होतं. याचबरोबर देव-देवतांच्या पूजाअर्चा, यज्ञकर्म आदी धार्मिक कामंही त्यांच्याकडे सोपवलेली असत. राज्याचं रक्षण, संरक्षण, कायदा व सुव्यवस्थेची काळजी घेणं, संकटात अडकलेल्या नागरिकांची सुटका करणं, नागरिकांसाठी सुविधा निर्माण करणं आदी क्षत्रियांची कर्तव्यं होती. यात राजे-महाराजे, शासनकर्ते, सेनापती, सैनिक आदींचा समावेश होता. राज्यकारभार चालवण्यासाठी आवश्यक कर गोळा करणं, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणं, नागरिकांच्या जीविताचं व संपत्तीचं रक्षण करणं, युद्धकौशल्य आत्मसात करणं व प्रत्यक्ष युद्धात सहभागी होणं हे क्षत्रियांचं कर्म मानलं गेलं. व्यापार उदीम करणाऱ्यांना वैश्य म्हटलं गेलं. राज्यामध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंचा राज्यात तसंच राज्याबाहेर व्यापार करणं, तसंच राज्यात उत्पादित न होणाऱ्या परंतु नागरिकांना आवश्यक अशा वस्तू राज्याबाहेरून खरेदी करणं, राज्यात त्यांची विक्री करणं ही वैश्यांची कामं होती. या वस्तुंमध्ये अन्नधान्य, वस्त्र, शस्त्रसामग्री वगैरे वस्तुंचा समावेश असे. वैश्याने व्यापार सचोटीने करावा, ग्राहक उत्पादक व शासनाची फसवणूक करू नये. कोणाचीही पिळवणूक करू नये अशी नैतिक बंधनं या वर्णावर होती. समाजाला सेवा देणं, शुश्रूषा करणं, समाजाची देखभाल करणं, अन्य तीन वर्णांना त्यांच्या त्यांच्या कर्मात जी जी मदत लागेल, सेवा लागेल ती देणं हे शूद्र वर्णाचं कर्म मानलं गेलं. समाजाची 'सपोर्ट सिस्टम' असं त्याचं स्वरूप होतं.

आधी म्हटल्याप्रमाणे प्राचीन काळात कर्म निवडण्याचा अधिकार व्यक्तीला होता. माणूस कोणत्याही वर्णात जन्माला आला तरी त्याच्या कर्माच्या आवडीनुसार तो त्या त्या वर्णात जात असे. जर शूद्र वर्णात जन्मलेल्या एखाद्या व्यक्तीला युद्धकौशल्याची आवड असेल, तिची शरीरयष्टी मजबूत व धडधाकट असेल आणि ती मनाने खंबीर असेल तर ती कोणत्या ना कोणत्या युद्धकलेत निपुण होऊन सैन्यदलात जाऊ शकत असे. क्षत्रियांचं कर्म स्वीकारल्यामुळे ती क्षत्रिय होत असे. ब्राह्मण वर्गातल्या एखाद्या व्यक्तीला व्यापाराची आवड असेल, व्यापारातील जोखीम स्वीकारण्याची त्याची वृत्ती असेल तर ती व्यापार करू शकत असे. वैश्याचं कर्म स्वीकारण्यामुळे ती वैश्य होत असे. अशाप्रकारे या व्यवस्थेत प्रत्येकाला निवडीचा

अधिकार असल्याने आणि चार वर्गात कामाची विभागणी झाल्यामुळे त्या त्या वर्णातल्या आणि त्या वर्णात प्रवेश करू इच्छिणाऱ्यांना काम उपलब्ध असे. चारही वर्णांमध्ये वेगवेगळ्या कौशल्यांना प्राधान्य असल्याने प्रत्येक वर्णाला प्रतिष्ठा होती आणि समाजात स्थान होतं. ही व्यवस्था त्या काळच्या समाजातल्या प्रगतीसाठी पूरक होती. मात्र कालांतराने या व्यवस्थेचं विशुद्ध रूप हरवलं आणि त्याची जागा कर्मठपणाने घेतली. या एका खुल्या व्यवस्थेचं रूपांतर कर्मठ व्यवस्थेत होत गेलं. कर्मानुसार वर्ण या संकल्पनेची जागा जन्माप्रमाणे वर्ण या संकल्पनेने घेतली. जो ज्या वर्णात जन्माला आला तो आजन्म त्याच वर्णाचा असा जणू नियमचं बनला. चार वर्णांमध्ये भेदभाव निर्माण झाले. कामाच्या विभागणीकडे श्रेष्ठ काम आणि कनिष्ठ कामं अशा दृष्टीनं पाहिलं जाऊ लागलं. अशाप्रकारे असंतुलित झालेल्या समाजाचा कालमानानुसार ऱ्हास सुरू झाला.

एका ठराविक काळापर्यंत आई-वडिलांचे जे जीन्स होते, ते गुणधर्म होते ते मुलांमध्ये येणं स्वाभाविक होतं. हे झाले उपजत गुण, याशिवाय जन्मापासून मूल आई-वडीलांचं काम पाहात असे, त्याचं निरीक्षण करत असे. आई-वडिलांना त्यांच्या कामात छोटी-मोठी मदत करत असे त्यामुळे कुटुंबाचा आधार असलेल्या व्यवसायाचं लहानपणापासून मुलाला बाळकडू मिळत असे, त्यात त्याला पारंगत होता येत असे. व्यवसाय करताना आई-वडिलांनी खाल्लेले टक्केटोणपे त्याने पाहिलेले असत. त्यामुळे त्यातले धोके-जोखिमा त्याला समजत असत. त्यामुळे मुलगा पंचवीस वर्षांचा होताना त्याच्याकडे कदाचित पन्नास वर्षं व्यवसाय करणाऱ्याइतका अनुभव गोळा होत असे त्यामुळे मुलाने वडिलांचाच व्यवसाय पुढे करत रहावं अशी प्रथा पडली असावी. प्राचीन काळच्या व्यवस्थेतही हे घडत असावं परंतु त्यावेळी वर्णांतराला मुभा होती व समाजाचीही त्याला मान्यता होती. ब्राह्मणांच्या, क्षत्रियांच्या, वैश्यांच्या व शूद्रांच्या पोटी इतर कोणत्याही वर्णाला लायक मूल जन्माला येऊ शकतं हे समाजाला मान्यं होतं.

वास्तविक पाहता हे चार वर्ण म्हणजे समाज व्यवस्थेचे चार पाय आहेत आणि त्यात कोणी एक श्रेष्ठ व बाकी कनिष्ठ असा भेदभाव करणं हीच चुकीची गोष्ट आहे. परंतु त्याकाळातील समाज व्यवस्थेमधील पारदर्शकता कालांतराने नाहीशी झाली आणि तिची जागा कर्मठ अशा जातीव्यवस्थेने घेतली. एखाद्या व्यवसायाच्या नावाने असलेल्या जातीत जन्माला आलेल्या मुलाने मागे-पुढे दुसरा कोणताही

व्यवसाय केला तरी त्याची जात बदलत नाही. जन्माने जी जात त्याला मिळाली ती कायम राहाते. आज असे लोक आहेत जे जन्माने एखाद्या जातीचे आहेत पण ते त्या जातीचा व्यवसाय करत नाहीत. उदाहरणार्थ, एखादा जन्माने सोनार आहे पण तो सोन्याचांदीचे दागिने घडवण्याचं काम करत नाही. इंजिनियर असल्याने तो रस्त्यांचं बांधकाम करतो. जी जात नाही ती 'जात' असं म्हटलं जाऊ लागलं आहे.

आता हे थोडंसं काहीशा वेगळ्या स्वरूपातही दिसू लागलं आहे. उदाहरणार्थ, डॉक्टरच्या मुलाने डॉक्टर व्हावं, वकिलाच्या मुलाने वकील व्हावं, इंजिनियरच्या मुलाने इंजिनियर व्हावं असा अट्टाहास दिसून येतो. डॉक्टरच्या मुलाची डॉक्टर होण्याची इच्छा नसेल, त्याची त्याला आवड नसेल तरीही त्याला डॉक्टर बनवण्याचा आटापिटा केला जातो. वेगवेगळ्या विषयांच्या ट्युशन्स लावून, भरमसाठ डोनेशन देऊन मुलाला कसंबसं डॉक्टर केलं जातं. एखाद्याची आवड नसेल, इच्छा नसेल तरी बळजबरीने ते काम करताना त्याच्यात तो रस राहात नाही. त्यातील नवं काही शिकावं, त्यात तज्ज्ञ व्हावं असं त्याला वाटत नाही. पाट्या टाकण्यासारखं तो काम करत राहतो. त्याचा फायदा समाजाला होत नाही आणि त्यालाही होत नाही. याऐवजी त्याच्या आवडीचं शिक्षण त्यानं घेतलं असतं, त्याचं ज्ञान मिळवलं असतं, कौशल्य मिळवलं असतं तर त्याचा लाभ त्याला स्वत:ला आणि समाजाला नक्कीच झाला असता. थोडक्यात, कर्माची निष्ठा ज्याने त्याने स्वत:च्या आवडीप्रमाणे करावी. त्याच्या कर्मानुसार त्याचा वर्ण ठरला पाहिजे. 'कर्म' हाच तुमचा 'धर्म' झाला पाहिजे.

म्हणजे शिकण्याची-शिकवण्याची आवड असलेल्या व्यक्तीने ब्राह्मणाच्या कर्माचा स्वीकार करून तो त्याचा धर्म मानला पाहिजे. त्याला स्वत:ला ज्ञानलालसा असली पाहिजे. स्वयंशिस्त असली पाहिजे. माझ्या विद्यार्थ्यांचं भलं व्हावं ही इच्छा मानली पाहिजे आणि त्यासाठी त्याने चोवीस तास वेळ दिला पाहिजे. स्वत: सतत शिकणं आणि इतरांना पुन्हा पुन्हा शिकवत राहाणं हे त्याने त्याचं कर्तव्य मानलं पाहिजे. एखाद्याने त्याच्या आवडीच्या कर्मानुसार क्षात्रधर्म मान्य केला असेल तर त्याने त्याच्या आवडीचं लष्करी प्रशिक्षण घेतलं पाहिजे. वेगवेगळी शस्त्रं चालवण्याचं कसब आत्मसात केलं पाहिजे. त्यात अचूकता मिळवली पाहिजे. त्याला राज्यकारभाराची आवड असेल तर त्याने त्याचं रीतसर शिक्षण घेतलं पाहिजे. राज्याच्या प्रशासनाचं - व्यवस्थापनाचं कौशल्य मिळवलं पाहिजे. नि:स्वार्थपणे अणि नि:स्पृहपणे त्याने समाजाच्या हिताचं काम केलं पाहिजे. समाजासाठी काम करताना त्याने कोणताही

दुजाभाव करता कामा नये. आपल्या कुटुंबातल्या, नात्यातल्या, परिचयातल्या व्यक्तीला एक वागणूक आणि इतरांना दुसरी अशी त्याची रीत असता कामा नये. जर एखाद्याने वैश्यांचे कर्म मानून तो धर्म स्वीकारला तर त्याने सचोटीने व्यापर करणं, कोणाचीही कोणत्याही प्रकारे फसवणूक न करणं, योग्य भाव देणं, योग्य भाव मिळवणं या तत्त्वांचं पालन केलं पाहिजे. मनापासून सेवा देणं हे शूद्रांने कर्तव्य मानून शूद्र धर्माचं पालन केलं पाहिजे. थोडक्यात, कर्म हाच तुमचा वर्ण आणि तुमचा धर्म झाला पाहिजे.

हा धर्म कशा पद्धतीने चालवला गेला पाहिजे? तर यात सुद्धा एक प्रकारचा 'यज्ञ' आहे. तुम्ही सतत तुमचं कर्म करत राहाणं हा तो यज्ञ. यामध्येही 'तपसाधना' आहे. तुम्ही जे कर्म करीत आहात त्यातील जास्तीत जास्त ज्ञान मिळवणं, जास्तीत जास्त कौशल्य संपादन करणं ही 'तपसाधना' यामुळे तुम्ही करत असलेलं काम सर्वोत्कृष्ट व सर्वांना लाभदायक ठरतं. यामध्येही 'दान' आहे. प्रत्येक गोष्ट पैशांत मोजणं योग्य नसतं. तुमच्या कामाशी संबंधित काही गोष्टी तुम्ही दानरूपाने समजाला दिल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, तुम्ही शिक्षक असाल तर गरजू मुलांना तुम्ही मोफत शिकवू शकता. तुम्ही डॉक्टर असाल तर गरिबांच्या वस्तीत जाऊन मोफत उपचार करू शकता. पैशांच्या दानापेक्षा तुमचं हे दान समाजासाठी अधिक मोलाचं ठरू शकतं. 'तपसाधने'त संशोधनाचाही समावेश होऊ शकतो. तुमचं कर्म जास्तीत जास्त उत्कृष्ट व फलदायी कसं होऊ शकेल याचा शोध तुम्ही घ्यावा, त्याबद्दल संशोधन करावं. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकरी बांधवाने वेगवेगळ्या पिकांच्या अधिकाधिक उत्पादन देणाऱ्या जाती शोधून काढाव्या, पाण्याचा कमीत कमी वापर करून उत्पादन कसं वाढेल यावर संशोधन करावं, धान्याची साठवण क्षमता कशी वाढवता येईल, धान्याची वाहतूक जलद कशी करता येईल याचे प्रयोग करावेत. थोडक्यात, यज्ञ, तप आणि दान या साधनांचा योग्य वापर करून तुम्ही तुमचा 'धर्म' चालवला पाहिजे. कर्मामध्ये आपली काही मूलभूत कर्मं आहेत. मातापित्यांप्रती मुलाचं कर्म, मुलांप्रती मातापित्यांचं कर्म, कुटुंबाप्रती कर्म, समाजाप्रती कर्म अशी सगळी कर्मं त्यात येतात. ही कर्म पार पाडण्यातच मनुष्याचा उत्कर्ष आहे. यासाठी संस्काराचं प्रशिक्षण आवश्यक आहे. त्याबद्दल वेगळ्या लेखात चर्चा केलेली आहे.

आपण चार पुरुषार्थ मानलेले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. धर्माचं ज्ञान मिळवणं, कौटुंबिक जबाबदारीचं पालन करण्यासाठी अर्थप्राप्ती करणं, म्हणजेच पैसे मिळवणं, चरितार्थ चालवणं, संतती निर्माण करणं आणि अंतिमत: मोक्ष प्राप्त

करणं हे चार पुरुषार्थ आहेत. या पुरुषार्थाचं पालन प्रत्येकाने करणं आवश्यक आहे कारण ही मुनष्याची नैतिक कर्तव्यं आहेत आणि तुम्ही कोणत्याही 'वर्णाचे' असाल तरी त्याचं पालन आवश्यक आहे. समाजाच्या नैतिकतेचं ते अधिष्ठान आहे. आपल्याकडे आधी बलुतेदारी व्यवस्था अस्तित्वात होती हे तुम्हांला माहीत असेल. ही व्यवस्था परस्पर देवाण घेवाणीची बार्टर सिस्टिमसारखी होती. ती कृषिआधारित होती. शेतकरी बांधव शेती करायचे, धान्य पिकवायचे, दैनंदिन जीवन जगताना त्यांना बारा प्रकारच्या बलुतेदारांची मदत व्हायची. सोनार, शिंपी, लोहार, चर्मकार, सफाई कामगार, वगैरे. आपण पिकवलेल्या धान्यावर त्यांचा सुद्धा हक्क आहे असं मानून शेतकरी त्यांना पायली दोन पायली धान्य देत असत. त्याचप्रमाणे बलुतेदार लोकसुद्धा त्यांच्या कामात शेतकऱ्यांचा हिस्सा आहे असं सांगून त्यांना तो देत असत. परस्पर देवाणघेवाणीवर आधारित असं हे जीवनचक्र वर्षानुवर्षे चालू होतं. त्यातून एकजिनसी स्वयंपूर्ण असं एक गाव आकाराला येत होतं.

आज काय झालं आहे? गावाचा एकजिनसीपणा हरवला आहे. स्वयंपूर्णता लोप पावली आहे. एकाच ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात वस्तू उत्पादित केल्या जात आहेत. या ठिकाणाहून वस्तूंची दुसऱ्या ठिकाणी वाहतूक केली जाते. तसंच ज्या ठिकाणी ज्या वस्तूचं उत्पादन होत नाही त्या ठिकाणी त्या वस्तू बाहेरून आणल्या जात आहेत. यामुळे एकूणच वस्तूंच्या उपलब्धतेच्या व्यवस्थापनाचा खर्च वाढत चालला आहे व यामुळे वस्तू महाग बनत आहेत. त्याचबरोबर एखादं-दुसऱ्या ठिकाणीचं उद्योगांचं केंद्रीकरण झाल्यामुळे तिथेच रोजगार उपलब्ध होत आहे. अन्य ठिकाणी हातांना काम मिळत नाही अशी स्थिती आहे. तिथे बेरोजगारी वाढली आहे. रोजगार मिळवण्यासाठी लोक आपलं गाव सोडत आहेत त्यामुळे एकीकडील शहरं फुगत चालली आहेत तर दुसरीकडे गावं ओस पडत आहेत. शहरांमध्येसुद्धा बेरोजगारी वाढत आहे; कारण उत्पादनाचं मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झालं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शहरांमध्ये नोकरी-उद्योगाच्या निमित्ताने झालेल्या स्थलांतरामुळे लोकसंख्या वाढल्यामुळे शहरी समस्या देखील वाढत आहेत. रस्ते, पाणी, वीज, गटारं वगैरेंच्या समस्यांपुढे नागरी जीवन हैराण झालं आहे. आधी म्हटलं त्याप्रमाणे पूर्वी गावं स्वयंपूर्ण होती. गांधीजींनी स्वयंपूर्ण खेड्याचं स्वप्न दिलं आहे. पूर्वी शहर असो की गाव तिथे काम करण्याच्या संधी होत्या व साधंसुधं का असेना लोक जीवन आनंदाने जगत होते. गावं पुन्हा स्वयंपूर्ण होण्यासाठी आपल्याला पुन्हा पूर्वीच्या रचनेचा

विचार केला पाहिजे.

भक्तिमार्गातील अनेक संत आपल्याला माहीत आहेत. वेगवगेळ्या बलुतेदारी समुदायातील हे संत होते. आपली कर्म आणि कर्तव्य पार पाडत असताना ते भक्तीसाधनाही करत होते. आपलं काम करत असताना मोक्षाचा विचार करायचा नाही असं काही नाही. तेव्हा वर उल्लेख केलेल्या चार वर्णांना, चार धर्मांना, त्यातील सगळ्यांना मोक्षाची दारं मोकळी होती. धर्माच्या बाबतीतही स्वातंत्र्य होतं. अर्थप्राप्तीची दारं सर्वांना खुली होती आणि मोक्षाची दारंही मोकळीच होती. त्यामुळे समाजात नैतिकता होती. सुसूत्रता होती आणि एक प्रकारे समाजाचं विकेंद्रीकरण होतं. आज आपण मॉलमध्ये पाहतो, सगळ्याच गोष्टी एका ठिकाणी मिळतात. त्याचे काही फायदे असतीलही पण त्यामुळे चार हातांचा रोजगार हिसकावून घेतला जातो, असं आपल्याला वाटत नाही का? एका छताखाली सर्व वस्तू उपलब्ध केल्यामुळे मॉलवाल्यांचा धंदा वाढतो पण मॉल नसते तर ज्यांचा धंदा टिकला असता अशा लोकांच्या पोटावर पाय दिल्यासारखं नाही का?

कर्म चातुर्वर्ण ठरविताना एखाद्या वर्णात / व्यवसायात खूप भाऊगर्दी तर दुसऱ्या वर्णात / व्यवसायात कुशल व्यक्तींचा तुटवडा असेही चित्र दिसते. तर शिकविणाऱ्या ब्राह्मण वर्गापेक्षा शूद्र सेवा वर्गाचा आज समाजात दबदबा दिसतो. हे चित्र सुद्धा दूरदृष्टीचा विचार करता फायद्याचे नाही. सर्वच क्षेत्रात वाढता भ्रष्टाचार किंवा डोनेशन / वशिलेबाजी / आरक्षण ठेवल्यामुळे त्या त्या व्यवसायातील तप / दान / स्वाध्याय त्या गोष्टी अभावानेच दिसतात त्यामुळे समाजाची सखोल प्रगती होताना दिसत नाही. जोपर्यंत आपण आदर्शवादाची स्वप्ने बघणार नाही व त्यानुसार कर्मे करणार नाही तो आपला धर्म समजणार नाही तोपर्यंत प्रत्येक वर्ग आपल्या पायापुरते पाहात राहील की जे भविष्यात किती काळ टिकेल याची शाश्वती साक्षात ब्रह्मदेवही देऊ शकणार नाही.

शेवटी आपल्याला काय हवं असतं ? जीवनात शांती समाधान हवं असतं. त्यागामुळे शांती मिळते. वस्तूंच्या मोहाच्या मागे लागल्याने शांती मिळत नाही. माझ्या मते, जगात अशी कोणतीही व्यक्ती नाही, जी या जगातला सगळा श्वास घेऊ शकेल, सगळं पाणी पिऊ शकेल, सगळ्याचा उपभोग घेऊ शकेल अशी कोणीही व्यक्ती नाही जी जगातलं सगळ्या प्रकारचं काम एकटी करू शकेल. प्राचीन काळापासून आपण पाहिलं तर एकीनं एकत्र असल्याशिवाय आणि एकमेकांना आधार

दिल्याशिवाय माणसाची प्रगती झालेली आपल्याला दिसत नाही. जगातल्या साधनसामुग्रीची आणि कामाची विभागणी आवश्यकच आहे. त्यामुळे समाजाचा आधार असलेले चार वर्ण त्यांच्यामधील भेदाभेदांशिवाय कर्मांच्या निवडीच्या स्वातंत्र्यासहित आणि मोक्षापर्यंत पोहोचण्याच्या समान संधींसहित विचारात घेतले तर ही रचना आजच्या काळातही किंबहुना जोपर्यंत पृथ्वीवर माणूस आहे तोपर्यंत आवश्यकच आहे असं मला वाटतं.